**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : १०२८/२०२१**

**तक्रारकर्ता,** श्री.प्रमोद रामपाल शुक्ला,
आनंदाश्रम, माहिम रोड,
पालघर ता.जि.पालघर

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक
नगररचनाकार, नगररचना विभाग, पालघर
नगरपरिषद पालघर, ता.जि.पालघर

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक
नगररचनाकार, नगररचना विभाग, पालघर
नगरपरिषद पालघर, ता.जि.पालघर

**तक्रार सुनावणीचा दिनांक : ११/८/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २१/१/२०२१ | ---- | ३/३/२०२१ | ७/४/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.१८/६/२०२१ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ११/८/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती रोशनी तामखेडे, सहायक नगररचनाकार अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.अजय भास्कर संखे, सहायक नगररचनाकार, पालघर नगरपरिषद उपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" *बांधकाम परवानगी, नकाशाचे संबंधित परवानगीसाठी जोडलेले कागदपत्र मिळणेबाबत व इतर माहिती* "

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.७/४/२०२१ रोजी, "*अर्जदार यांनी अपिलासोबत श्री.अभिजीत कमलेश्वर श्रीवास्तव या नावाच पत्र जोडल आहे. त्या नावाची माहिती १५ दिवसात विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, तक्रारकर्ता यांना दि.५/२/२०२१ पत्रान्वये माहिती दिली आहे. तसेच त्यानंतर दि.१६/४/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविले की, आपण अपेक्षिलेली सदर विषयांकीत माहितीची नोंद सध्याच्या उपलब्ध अभिलेखात आढळून येत नाही.

वास्तविक तक्रारकर्ता यांनी स्पष्टपणे " *बांधकाम परवानगी, नकाशाचे संबंधित परवानगीसाठी जोडलेले कागदपत्र मिळणेबाबत व इतर माहिती* " अशी माहिती मागितली होती. सदर प्लॉट नंबर व सर्वे नंबरवर बांधकाम परवानगीसाठी जे कागदपत्रे जोडलेली असतील ती मिळावीत अशी तक्रारकर्ता यांची अपेक्षा होती. ती का देऊ शकत नाही हे तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केलेले नाही. त्याही पुढे जाऊन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश देऊन सुध्दा तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. म्हणजेच तत्कालिन

जन माहिती अधिकारी श्रीमती रोशनी तामखेडे, सहायक नगररचनाकार यांनी जाणीपूर्वक तक्रारकर्ता यांना माहिती दिली नाही असे दिसून येते.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांनी मागणी केलेली माहिती १५ दिवसात जलद टपालाने निःशुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती रोशनी तामखेडे, सहायक नगररचनाकार, पालघर नगरपरिषद यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २१/१/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत माहित दिली नाही तसेच प्रथम अपील आदेशानंतरही माहिती पुरविण्यास नकार दिला त्यामुळे त्यांना योग्य ती माहिती प्राप्त होऊ शकली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.२९/९/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ११ ऑगस्ट, २०२५ .

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती रोशनी तामखेडे, सहायक नगररचनाकार, पालघर नगरपरिषद **- यांना प्रत** --
--मुख्याधिकारी,
पालघर नगरपरिषद पालघर,
ता.जि.पालघर **यांचेमार्फत रवाना.** (मुख्याधिकारी यांनी सदरची प्रत संबंधित तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना तात्काळ बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)